जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक ३१.०७.२०२५**

‘‘ अवैधरित्या २ अग्निशस्त्र आणि जिवंत काडतुसे बाळगणाऱ्या इसमांस अटक ’’

दि.३०/०७/२०२५ रोजी मिळालेल्या गोपनीय माहिती वरून, गुन्हे शाखा घटक-१ चे पथकाने साकेत कॉम्प्लेक्स रोड, राबोडी ठाणे येथे सापळा रचुन, **जाबीर इलियास सिध्दीकी, वय- ३६ वर्षे, धंदा- ड्रायव्हर, रा.कौसा-मुंब्रा** यास **दोन देशी बनावटीचे पिस्टल व दोन काडतुसांसह** ताब्यात घेवून त्यास अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी आरोपी विरुद्ध राबोडी पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं.३५५/२०२५, शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३,२५ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१), १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन आरोपीस दि.०३/०८/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी मंजुर करण्यात आला आहे. नमूद गुन्ह्याचा तपास पोलीस उप निरीक्षक/ रविंद्र पाटील, गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे हे करीत आहेत

सदरची कारवाई ही डॉ.पंजाबराव उगले, अपर पोलीस आयुक्त , गुन्हे, श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री.शेखर बागडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, शोध-१ गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली, श्री सचिन गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, घटक-१ ठाणे, पोलीस उप निरीक्षक/ प्रकाश शिरसाठ, रविंद्र पाटील, पोहवा/धनंजय आहेर, नंदकुमार पाटील, पोशि/मयुर लोखंडे, सागर सुरळकर यांच्या पथकाने केली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर